| | |
|---|---|
| MHJN070001412024 | **किरकोळ दि. अर्ज क्र. १५/२०२४**<br>**मोहम्मद एजाज .. वि.. निरंक** |

**निशानी क्रमांक ०१ वर आदेश पारीत.**

**(आदेश दिनांक १३.०७.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनीयम १८२७ चे कलम २ व ३ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे करीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार यांचे वडील हकीम खा रहीम खा यांचा मृत्यू दि. १९.०५.१९५३ रोजी मौजे जालना ता.जि.जालना येथे मयत झाले. अर्जदार यांच्या वडीलांचा मृत्यु निबंधक कार्यालय येथे दिनांक २७.१०.२०२२ रोजी नोंदणी केलेली आहे. अर्जदाराची आई कमरुनीसा हकीम खा दिनांक ०३.१२.१९८९ रोजी जालना येथे मयत झाली आहे. त्यांची मृत्यूची तारीख नगर परिषद, जालना येथे दिनांक ०९.१२.२०२२ रोजी नोंदणी केलेली आहे. मयताचे प्रस्तुत अर्जदारा व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने सदर अर्ज वारस दाखला मिळण्याकरिता सादर केला आहे.

३. अर्जदाराच्या विनंतीस आक्षेप मागविण्याकरिता न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदार यांनी यादी नि.क्र.९ नुसार 'दैनिक सकाळ' दिनांक १४.०२.२०२४ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटण प्रसिध्द करण्यात आले. तसेच सदर अर्जाला गैरअर्जदार यांनी आक्षेप नि.क्र.१४ दाखल करुन अव्हानीत केलेले आहे. त्याप्रमाणे अर्जदाराचा पुरावा दाखल करुन गैरअर्जदार हसीबुद्दीन अल्लाउद्दीन सय्यद नि.क्र.२२ प्रमाणे उलटतपास घेण्यात आला.

४. प्रस्तुत अर्जामधील कथनांच्या पृष्ठयार्थ अर्जदार मोहमंद एजाज खान याने शपथेवर न्यायालयासमक्ष मयत हकीम खा रहीम खा यांचा मृत्यू प्रमाणपत्र **नि.क्र.३/१** व त्यांची आई कमरुनिसा यांचे मृत्यू प्रमाणपत्र **नि.क्र ३/२**, अर्जदार मोहमंद एजाज

खान यांचा आधार कार्ड **नि.क्र.३/३** न्यायालयात सिध्द केलेले आहे. तसेच अर्जदार हा मयताच्या दफनविधीमध्ये हजर असल्याबाबत कब्रस्तान यांचे दफन प्रमाणपत्र नि.क्र. **२०/१** व **नि.क्र.२०/२, व नि.क्र.३०,** अर्जदाराचे पॅन कार्ड नंबर **नि.क्र.२०/३** अभिलेखावर दाखल केलेले आहे.

**५.** गैरअर्जदारातर्फे अर्जदार हा मयताचा वारस नसल्याबाबत चा आव आणून दिर्घ उलटतपास घेण्यात आला. सदर उलटतपासामध्ये अर्जदाराचा जन्म हैदराबाद येथे झाला होता व तो त्यांच्या वडीलासोबत राहत असलयाचे सांगितलेले आहे. अर्जदाराच्या वडीलांचे घर म्हसरुळ या गावात असल्याचे अर्जदारास माहिती नसल्याबाबत दिसून येते. अर्जदाराचे शिक्षण हैदराबाद येथे झाल्याचे व त्याने वडीलाचे मृत्यू प्रमाणपत्र दिनांक २७.१०.२०२२ रोजी प्राप्त केलयाचे सांगितले आहे. पुराव्यातून स्पष्ट होते की, अर्जदाराने त्याच्या वडीलांच्या मृत्यू प्रमाणपत्रा करिता स्वतःचे शपथपत्र दिल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात आले. गैरअर्जदारातफे अर्जदाराचे नाव आधारकार्डवर तेलगू भाषात नमुद असल्याचे कबूल केले आहे. प्रस्तूतचा अर्ज केवळ वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे. याउलट गैरअर्जदारातर्फे अर्जदार हा मयताचा वारस नसल्याबाबत कुठलाही सबळ पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**६.** अर्जदार हा गैरअर्जदाराचा कुठलाही नातेवाईक किंवा वारस असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. गैरअर्जदारातर्फे अर्जदाराच्या अर्जाकरिता केवळ अर्जदार हा मयताचा वारस नसल्याबाबत आक्षेप घेतल्यामुळे गैरअर्जदारास त्याचा आक्षेप सिध्द करण्याकरिता पुरेशी संधी दिलेली आहे. गैरअर्जदारातर्फे अर्जदार हा मयत हकीम खा रहीम खा यांचा वारस नसल्याचे कूठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराच्या कथनांना गैरअर्जदारातर्फे कुठेही बाधा आलेली नाही. प्रस्तुत आक्षेप हा गैरअर्जदार हसीबुद्दीन अलाउद्दीन सय्यद तर्फे मुखत्यार सय्यद मोबीनोद्दीन याने दाखल केला होता. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने शपथपत्रवर दाखल केला असल्यामूळे व त्याच्या कथनांना गैरअर्जदारातर्फे सबळ पुराव्याने आव्हानीत न केल्यामुळे अर्जदाराचे कथन स्पष्ट सिध्द झाले आहे.

**७.** तसेच अर्जदाराचे मयताशी असलेले नाते संबंध विचारात घेता, वरील अर्जदार

हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्यास औपचारीक मान्यता देण्यास बाधा नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचीत आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार मोहमंद एजाज खान पिता अब्दुल हकीम खान हे **मयत हकीम खा रहीम खा** रा. म्हसरुळ, ता. जाफ्राबाद, जि. जालना यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला देण्यात येतो.

३. दिवाणी पुस्तीका प्रकरण क्र. १४ मधील परीच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मुळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमुद करावी.

४. अर्जदार यांना आवश्यक मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर ).

AMIT NARENDRA KHATADE

Digitally signed by AMIT NARENDRA KHATADE
Date: 2026.07.13 17:45:13 +0530

दिनांक – १३.०७.२०२६

(ए.एन.खताडे)
दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर,
जाफ्राबाद.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द नि शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

स्वाक्षरीत/–

दिनांक १३ /०७/२०२६

(आर. आर. मिसाळ )
लघुलेखक.